# प्रेसनोट

कर आकारणी व कर संकलन कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांक २५/०५/२०२६

विषय:- मिळकतकर सवलतीत भरणेसाठी केवळ ५ दिवस शिल्लक

पुणे महानगरपालिकेच्या कर आकरणी व करसंकलन विभागामार्फत सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, सन २०२६-२७ ची सर्व देयके यापूर्वीच पाठवण्यात आलेली आहेत, नागरिकांच्या सोयीसाठी व कर भरण्यास प्रोत्साहन देण्यासाठी मिळकत कराच्या सर्वसाधारण करामध्ये ५/१०% सवलत जाहीर करण्यात आलेली आहे.

ही सवलत दि. ३१ मे २०२६ पर्यंत लागू राहणार असून, जे नागरिक आपला संपूर्ण मिळकतकर विहित मुदतीत भरतील त्यांनाच या सवलतीचा लाभ मिळणार आहे.

पुणे महानगरपालिका हद्दीत एकूण मिळकतींची संख्या **१५.०५ लक्ष** इतकी असून दि. ०१/०४/२०२६ ते दि. २५/०५/२०२६ अखेर (सायंकाळी ६ वाजेपर्यंत) **४,९६,३२५ लक्ष** इतक्या मिळकतधारकांनी रक्कम रु. **८४६.७८ कोटी** इतका मिळकतकर पुणे महानगरपालिकेकडे जमा केलेला आहे. यामध्ये **५१,९९२ लक्ष (१०.४८%)** इतक्या मिळकतधारकांनी रक्कम रु.**२१४.८९ कोटी** इतकी रक्कम धनादेशाद्वारे जमा केलेली आहे. तर **८६,३०९ लक्ष (१७.३९%)** इतक्या मिळकतधारकांनी रक्कम रु. **७४.८७ कोटी** इतकी रोख रक्कम स्वरूपात जमा केलेली आहे. तसेच सर्वाधिक **३,५८,०२४ लक्ष (७२.१३%)** इतक्या नागरिकांकडून online / digital प्रणालीद्वारे रक्कम रु **५५७.०२ कोटी** जमा करण्यात आले आहे.

तरी, सर्व मिळकतधारकांना आवाहन करण्यात येते की, दिनांक ३१ मे पूवी आपला संपूर्ण मिळकतकर भरून सवलतीचा लाभ घ्यावा. नागरिकांच्या सोयीसाठी बँक ऑफ महाराष्ट्र, आय.सी.आय.सी.आय., कॉसमॉस बँकेत देखील आपला मिळकतकर भरता येणार आहे. नागरी सुविधा केंद्रावर गर्दी होणार नाही, फार काळ थांबावे लागणार नाही याकरिता जास्तीत जास्त मिळकतधारकांनी ऑनलाईन पध्द्तीने propertytax.punecorporation.org या संकेतस्थळावर आपला मिळकतकर भरावा. नागरिकांनी या सुविधांचा उपयोग करून शहराच्या विकासात आपला सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

25.5.26

(रवि पवार)
उप आयुक्त
कर आकारणी व कर संकलन प्रमुख
पुणे महानगरपालिका